दैनिक
# चकमक

संपादक : शामसुंदर चितोडा    कार्यकारी संपादक : कैलास फुलारी

✲ वर्ष : ०१ ले ✲  ✲ अंक : ७७ ✲  ✲ रविवार १८ ऑक्टोबर २०२६ ✲  ✲ जालना ✲  ✲किंमत : २ रूपये ✲  ✲पृष्ठे : ४ ✲

◎Volume 01◎  ◎ Issue 77 ◎  ◎ Sunday, Date : 18 October 2026 ◎  ◎ Jalna ◎  ◎Price Rs. 2 ◎  ◎Pages 4 ◎

**नवरात्रीची आठवी माळ**

नवरात्रीच्या आठव्या दिवसाला महाअष्टमी किंवा दुर्गाष्टमी असे म्हणतात. या दिवशी प्रामुख्याने माता महागौरीची पूजा केली जाते

**माता महागौरीची पुजा**

**आजचा रंग : जांभळा**



## नाफेड च्या विक्रीतुन होणारा नफा शेतकऱ्यांना वाटप करा : आ. खोतकर



जालना : नाफेडने मागील हंगामात शेतकऱ्यांकडून खरेदी केलेल्या शेतमालाचे भाव आता वाढले असतील, तर त्या भाववाढीचा लाभ शेतकऱ्यांनाही मिळाला पाहिजे. खरेदी किंमत आणि आवश्यक खर्च वजा करून उरणारी संपूर्ण वाढीव फरकाची रक्कम दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना बोनसप्रमाणे आर्थिक मदत म्हणून द्यावी, अशी मागणी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

ऊस उत्पादकांना दिल्या जाणाऱ्या बोनसच्या धर्तीवर इतर शेतमाल उत्पादकांनाही दिलासा मिळावा, अशी भूमिका खोतकर यांनी मांडली आहे. शेतकऱ्यांच्या मालाला पुढे चांगला भाव मिळत असेल, तर त्यातून मिळणारी वाढीव रक्कम संकटाच्या काळात शेतकऱ्यांच्याच मदतीला यावी, अशी त्यांच्या मागणीमागील भावना आहे.

**शेतकऱ्यांचा माल, भाववाढीचा लाभही शेतकऱ्यांना!**

मागील वर्षी नाफेडने ज्या दराने शेतमाल खरेदी केला आणि आज त्या मालाला बाजारात जो दर मिळत आहे, यामध्ये फरक आहे. या वाढीव दराचा विचार करून शेतकऱ्यांना मदत देण्याचा आराखडा शासनाने तयार करावा. मात्र, अंतिम मदतीची रक्कम ठरविताना नाफेडला प्रत्यक्ष विक्रीतून किती रक्कम मिळाली, त्यातून मूळ खरेदी किंमत व आवश्यक खर्च किती वजा झाला, याचा प्रमाणित हिशेब घ्यावा, असे खोतकर यांनी स्पष्ट केले आहे. या फरकातील केवळ काही हिस्सा नव्हे, तर खर्च वजा जाता उरणारी संपूर्ण निव्वळ रक्कम शेतकऱ्यांच्या मदतीसाठी वापरावी, हा त्यांच्या मागणीचा मुख्य मुद्दा आहे. (पान ३ वर)

## मन हरिनामात तल्लीन झाले की जीवन भक्तिरसाने फुलते; संतविचार आचरणात आणणे हीच खरी भक्ती! : ह.भ.प. सोपान महाराज सानप

### हरिकीर्तनातून भक्तिरसाची पर्वणी; पुढील सात वर्षे नवरात्र उत्सव आणि कीर्तन सोहळ्याची परंपरा कायम ठेवणार : राहुल लोणीकर







परतूर/प्रतिनिधी : माणसाचे मन हरिनामात रमले, तर जीवनाला भक्तीचा खरा आनंद प्राप्त होतो. ज्याप्रमाणे पुत्राच्या शुभवार्तेने माता आनंदित होते, हरण नादात तल्लीन होते आणि कासवीची आपल्या पिलांवर निस्सीम माया असते, त्याचप्रमाणे मनाची ओढ परमेश्वराच्या चरणी असावी, असे हृदयस्पर्शी निरूपण ह.भ.प. सानप महाराज यांनी केले. आमदार बबनराव लोणीकर यांच्या संकल्पनेतून आणि राहुल लोणीकर मित्र मंडळाच्या वतीने परतूर येथे नवरात्रोत्सवानिमित्त भव्य हरिकीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचे निरूपण करताना सानप महाराज यांनी भक्ती, श्रद्धा आणि ईश्वराशी असलेल्या नात्याचे महत्त्व उपस्थित भाविकांना पटवून दिले. या वेळी पंचक्रोशीतील भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. यावेळी मनोगत व्यक्त करताना राहुल लोणीकर म्हणाले, परतूर नगरीतील भाविक नेहमीच धर्म, संस्कृती आणि अध्यात्मासाठी एकजुटीने पुढे येतात, ही अभिमानाची बाब आहे. आपल्या संतपरंपरेचे जतन आणि नव्या पिढीमध्ये संस्कार रुजविण्यासाठी अशा धार्मिक सोहळ्यांची गरज आहे. नवरात्रोत्सवानिमित्त सुरू केलेली हरिकीर्तन सोहळ्याची ही परंपरा पुढील सात वर्षेही (पान ३ वर)

## नवरात्रोत्सवानिमित्त नवतरुण गणेश मंडळातर्फे भाविकांना चहा व फळप्रसादाचे वाटप



परतूर : नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून सामाजिक बांधिलकी जपत नवतरुण गणेश मंडळाच्या वतीने श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक, रायपूर रोड, परतूर येथील साईबाबा मंदिर परिसरात रायपूर येथील श्री अंबाबाई मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या मान्यवरांसह भाविक भक्तांसाठी चहा, केळी व सफरचंद या फळप्रसादाचे वाटप करण्यात आले. नवरात्रोत्सव हा भक्ती, श्रद्धा आणि सेवाभावाचा उत्सव आहे. याच भावनेतून देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची सेवा करण्याच्या उद्देशाने मंडळाच्या वतीने हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. 'समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो' या भावनेतून भाविकांना नवरात्रीचे नऊ दिवस चहा व फळप्रसादाचे वाटप करून मंडळाने सामाजिक बांधिलकी जपली. या उपक्रमात नवतरुण गणेश मंडळाचे सुनील पुंड, जगदीश पाटील, लक्ष्मण हरकळ, नितीन शिंदे, अविनाश काळे, अभय चव्हाण, प्रतीक ढाकरगे, सुजय चंडालिया, बालाजी श्रीरसागर, योगेश मुजमुले, छत्रगुण सोळंके, दीपक चांदमारे, ओम शिंदे, ओम जाधव, अनिकेत वरकड, वैभव खांडेभराड, महादेव खवणे, वैभव काकडे, अक्षय गिराम, सुनील गिराम, कपिल आखाडे, महेश शिंगारे, संदीप जाधव, सचिन जाधव, वीरू वनवे, सचिन चव्हाण, महेश सांगोळे, आकाश बनकर, यश वायाळ, प्रदीप जाधव, नमन कावरे, करण डुकरे, समर्थ डुकरे, मयूर उबाळे, राम हरकळ, अनंत मोटे, दीपक खवणे, लक्ष्मीकांत जाधव, शुभम तेलगड, किरण आढे, अमोल पैठणकर, प्रमोद राठोड, श्रीपाद तरासे, बाळासाहेब काळुंके, रमेश डाके, गिरीश पेटकर आणि वीरेंद्र वाघमारे यांच्यासह मंडळाच्या सदस्यांनी व मित्रमंडळातील सहकाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग (पान ३ वर)

**सेवा हीच साधना आणि समाजहित हेच ध्येय!**

धार्मिक उत्सवाच्या माध्यमातून सामाजिक एकोपा, बंधुभाव आणि सेवाभाव वृद्धिंगत व्हावा, या उद्देशाने नवतरुण गणेश मंडळाच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. सर्व सदस्यांच्या सहकार्याने कार्यक्रम भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडला.

## देवी दहेगाव येथे रेणुका माता नवरात्रोत्सवाची सातवी माळ भक्तिमय वातावरणात साजरी

### देवीच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी; आरती, भजन आणि धार्मिक कार्यक्रमांनी परिसरात चैतन्य



**किशोर मोरे / घनसावंगी** : तालुक्यातील देवी दहेगाव येथे श्री रेणुका माता नवरात्र महोत्सव २०२६ निमित्त भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, आज नवरात्रोत्सवाच्या सातव्या माळेनिमित्त मंदिरात भाविकांची दर्शनासाठी गर्दी होत आहे. देवीच्या जयघोषाने परिसर दुमदुमून जात असून, धार्मिक उत्साहात नवरात्रोत्सव साजरा केला जात आहे. नवरात्रोत्सवानिमित्त मंदिरात दररोज विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. सकाळी ८.३० वाजता आणि रात्री ८.३० वाजता देवीची आरती, तसेच पहाटे ४ ते ५ या वेळेत काकड आरती केली जात आहे. या आरतीसाठी भाविक उपस्थित राहून श्री रेणुका मातेचे दर्शन घेत आहेत. महोत्सवात श्रीमद् देवी भागवत पारायणाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री. श्याम महाराज चव्हाण (दैठण) यांच्या सुमधुर वाणीतून देवी भागवताचे वाचन सुरू असून, भाविकांना प्रवचन आणि भागवत श्रवणाचा लाभ मिळत आहे. धार्मिक कार्यक्रमांमुळे गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. २० ऑक्टोबरला महाप्रसादाचे आयोजन सोमवार, १९ ऑक्टोबर रोजी (पान ३ वर)

## सोमठाणा गडावर जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते रेणुकादेवीची महापूजा



### नवरात्रोत्सवानिमित्त भाविकांच्या राहुट्यांना भेट; प्रशासनाच्या वतीने संवाद साधत शुभेच्छा

**नवनाथ गव्हाणे बदनापूर** : बदनापूर : शारदीय नवरात्रोत्सवाच्या निम्मिताने बदनापूर तालुक्यातील सोमठाणा गडावरील श्री रेणुकादेवी मंदिरात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते महापूजा व आरती करण्यात आली. यावेळी त्यांनी मंदिरात दर्शन घेत भाविकांशी संवाद साधला. नवरात्रोत्सवानिमित्त सोमठाणा गडावर भाविकांची मोठी गर्दी होत असून, अनेक भाविक मुक्कामी आहेत. यावेळी जिल्हाधिकारी मित्तल यांनी मुक्कामी असलेल्या भाविकांच्या राहुट्यांना भेट देऊन त्यांची विचारपूस केली. तसेच नवरात्रोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी निवासी जिल्हाधिकारी शशिकांत हताळे, उपविभागीय अधिकारी रामदास दांडगे, अंबडचे उपविभागीय अधिकारी पारधी, मंठा तहसीलदार सुमन मोरे, घनसावंगी तहसीलदार रमेश पंगोटी आणि बदनापूरचे तहसीलदार शंकर हंडेकर, तलाठी मारग साहेब, संतोष पाटील वरकड यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते. श्री रेणुकादेवी व महादेव मंदिर संस्थानच्या वतीने अध्यक्ष रामकिसन मेंढे यांच्यासह विश्वस्त मंडळाने जिल्हाधिकारी आशिमा मित्तल व उपस्थित अधिकाऱ्यांचे स्वागत केले. नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गडावरील धार्मिक वातावरणात महापूजा व आरती भक्तिभावाने पार पडली.

## सावरगाव घाट येथे २० ऑक्टोबरला दसरा मेळावा मुंडे समर्थकांसह समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे : प्रकाश जायभाये यांचे आवाहन



जालना/प्रतिनिधी : सावरगाव घाट (जि. बीड) येथील भगवान भक्तीगडावर २० ऑक्टोबर रोजी पारंपरिक दसरा मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. संत भगवान बाबा यांच्या विचारांचा वारसा आणि लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांनी जोपासलेली मेळाव्याची परंपरा यानिमित्ताने पुन्हा अनुभवायला मिळणार आहे. या मेळाव्यास राज्यभरातील समाजबांधव, वारकरी, कार्यकर्ते आणि मुंडे समर्थकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अखिल भारतीय वंजारी युवा संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रकाश जायभाये यांनी केले आहे.

संत भगवान बाबा यांची जन्मभूमी असलेल्या सावरगाव घाट येथील भगवान भक्तीगडावर दरवर्षी दसरा मेळाव्यानिमित्त भाविक आणि समाजबांधव एकत्र येतात. लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांनी या मेळाव्याला विशेष ओळख मिळवून दिली. यंदाही नेत्या पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली ही परंपरा पुढे सुरू राहणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

मेळाव्याला माजी मंत्री धनंजय मुंडे, माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे यांच्यासह विविध पक्षांचे आमदार, खासदार आणि मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांच्या वतीने देण्यात आली. 'वर्षभर कुठेही राहा, पण दसऱ्याला सावरगावला दिसा!' दसरा मेळावा हा केवळ धार्मिक सोहळा नसून समाजबांधवांच्या एकत्रीकरणाचे आणि संत भगवान बाबांच्या विचारांचे स्मरण करण्याचे व्यासपीठ असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. त्यामुळे राज्यातील विविध भागांत राहणाऱ्या समाजबांधवांनी या मेळाव्यास उपस्थित राहावे, असे आवाहन प्रकाश जायभाये यांनी केले.

'आपला दसरा, आपली परंपरा; गड ऊर्जेचा, गड आशेचा चला सावरगाव घाट!' या घोषणेतून त्यांनी समाजबांधवांना मेळाव्यात सहभागी होण्याचे (पान ३ वर)

## धारकल्याण येथे महाआरोग्य शिबिर संपन्न

### शिवसेना युवा सेना शिवसेना डॉक्टर सेल व स्वरा फाउंडेशनचा सामाजिक उपक्रम





**किशोर मोरे /घनसावंगी** : दिनांक १६ ऑक्टोबर रोजी, अर्जुन सेवा सप्ताह निमित्त शिवसेना- युवासेना शिवसेना, डॉक्टर सेल मराठवाडा व स्वरा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने, मा.आमदार तथा अंदाज समितीप्रमुख अर्जुभाऊ खोतकर यांच्या मार्गदर्शनाखाली अभिमन्यू दादा खोतकर शिवसेना युवासेना सचिव यांच्या उपस्थितीत, डॉ.उमेश जाधव सर, श्रीमती रोहिणीताई पिंपळे युवतीसेना जिल्हाप्रमुख आणि श्री.नागेश डवले युवासेना तालुकाप्रमुख यांच्या नेतृत्वामध्ये, मोफत आरोग्य तपासणी शिबिर, भव्य रक्तदान शिबिर आणि नेत्ररोग तपासणी शिबिर आज सदानंद महाराज मठ धारकल्याण येथे यशस्वीरित्या पार पडले.

या शिबिरासाठी गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यामध्ये मोफत सर्व रोग निदान शिबिर तसेच भव्य रक्तदान शिबिर आणि मोफत नेत्ररोग तपासणी शिबिर असे तिन्ही शिबिरे, खेड्यापाड्यातील कोरड्या दुष्काळाने ग्रस्त असलेल्या शेतकरी कष्टकरी आणि गरजवंत रुग्णांची सेवा व्हावी, त्यांना मानसिक आधार मिळावा हे आपले कर्तव्य आहे..आपण सर्वजण समाजच काही तरी देणं लागतो या अनुषंगाने या शिबिराचे आयोजन केले होते. या सर्व कार्याला लाडके आमदार, अर्जुभाऊ खोतकर यांनी शुभेच्छा दिल्या. या शिबिरासाठी सर्व युवासेना शिवसेना कार्यकारणी शिवसेना डॉक्टर सेल, मेडिकल विंग आणि स्वरा फाउंडेशनचे सर्व सदस्य उपस्थित होते.

## श्री गणपती पतसंस्थेचा पुंगळे कुटुंबाला मोठा दिलासा; विम्यातून १३ लाखांचे कर्ज माफ, ३.८२ लाखांचा धनादेश सुपूर्द



भोकरदन/ प्रतिनीधी : स्थानिक श्री गणपती नागरी सहकारी पतसंस्थेच्या राजूर शाखेने सामाजिक बांधिलकी आणि तत्पर ग्राहकसेवेचे दर्शन घडवत एका संकटग्रस्त कुटुंबाला मोठा आर्थिक आधार दिला आहे. संस्थेचे दिवंगत कर्जदार अप्पासाहेब कांताराव पुंगळे यांच्या कुटुंबाला कर्ज संरक्षण विमा योजनेच्या माध्यमातून तब्बल १७ लाख रुपयांचे विमा संरक्षण मिळवून देण्यात आले. यातून त्यांच्या नावावरील १३ लाख १७ हजार ९७१ रुपयांचे थकीत कर्ज पूर्णपणे निकाली काढण्यात आले असून, उर्वरित ३ लाख ८२ हजार ०२९ रुपयांचा धनादेश त्यांच्या वारसदारांना सुपूर्द करण्यात आला आहे.

कर्त्या व्यक्तीच्या निधनानंतर संस्थेचा पुढाकार मिळालेल्या माहितीनुसार, श्री गणपती नागरी सहकारी पतसंस्थेच्या राजूर शाखेकडून अप्पासाहेब कांताराव पुंगळे यांना व्यवसायासाठी १७ लाख रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले होते. मात्र, ४ नोव्हेंबर २०२५ रोजी त्यांचे अचानक निधन झाले. कुटुंबातील कर्त्या व्यक्तीच्या अकाली जाण्याने पुंगळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला होता, तसेच मोठ्या कर्जाची परतफेड कशी करायची, हा गंभीर प्रश्न त्यांच्यासमोर उभा ठाकला होता.

अशा बिकट परिस्थितीत संस्थेच्या व्यवस्थापनाने संवेदनशील भूमिका घेतली. कर्ज वितरणादरम्यान लागू केलेल्या विमा संरक्षणाच्या आधारे संस्थेने तातडीने आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली आणि विमा कंपनीकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरू ठेवला.

**१७ लाखांचा दावा मंजूर; वारसदारांना धनादेश वाटप**

संस्थेच्या या प्रयत्नांना यश येऊन विमा कंपनीने १७ लाख रुपयांचा संपूर्ण दावा मंजूर केला. या मंजूर रकमेतून दिवंगत अप्पासाहेब पुंगळे यांच्या खात्यावरील १३ लाख १७ हजार ९७१ रुपयांचे मुद्दल व व्याजासह असलेले संपूर्ण कर्ज पूर्णपणे नील (निकाली) करण्यात आले. त्यानंतर शिल्लक राहिलेली ३ लाख ८२ हजार ०२९ रुपयांची रक्कम संस्थेचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांच्या हस्ते दिवंगत कर्जदाराच्या पत्नी व वारसदार सुरेखा अप्पासाहेब पुंगळे यांच्याकडे धनादेशाद्वारे सुपूर्द करण्यात आली. संकटाच्या काळात पतसंस्थेने दाखविलेल्या या तत्परतेमुळे पुंगळे कुटुंबाला मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे. मान्यवरांची उपस्थिती धनादेश वितरण प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, अण्णासाहेब (पान ३ वर)

# संपादकीय

## संकटाचा सामना करण्याची प्रेरणा

करडा रंग हा शांतता, गंभीरता, समतोल आणि स्थिरतेचे प्रतीक मानला जातो. काळा आणि पांढरा या दोन रंगांच्या छटांमधील करडा रंग आपल्याला जीवनातील समतोलाची आठवण करून देतो. आयुष्य नेहमी आपल्या मनासारखे घडत नाही. कधी आनंदाचे क्षण येतात, तर कधी दुःखाच्या सावल्या मनाला व्यापून टाकतात. कधी यश मिळते, तर कधी अपयशातून शिकावे लागते. या सर्व परिस्थितींमध्ये मनाचा तोल सांभाळणे, संयम राखणे आणि योग्य निर्णय घेणे महत्त्वाचे असते. करड्या रंगाचा संदेश असा आहे की परिस्थिती कोणतीही असो, मनात धैर्य आणि विचारांत स्थिरता असावी. सातव्या माळेला करड्या रंगाचे वस्त्र परिधान करून माँ कालरात्रीचे स्मरण करताना आपण मनातील भीती, चिंता आणि नकारात्मक विचार दूर करण्याची प्रार्थना करू शकतो. सातव्या दिवशी सकाळी स्नान करून स्वच्छ वस्त्रे परिधान करावीत. देवीसमोर दिवा लावावा, फुले अर्पण करावीत आणि मनोभावे प्रार्थना करावी. आपल्या घरातील परंपरेनुसार नैवेद्य अर्पण करून देवीचे नामस्मरण करावे. गसेवा आणि करुणा: गरजूंच्या मदतीला धावून जावे आणि सर्वांशी माणुसकीने वागावे. माँ कालरात्रीचे स्वरूप आपल्याला सांगते की खरी शक्ती केवळ बाह्य सामर्थ्यात नसते; ती मनातील धैर्य, आत्मविश्वास आणि सत्याच्या मार्गावर चालण्याच्या निश्चयातही असते. तुझ्या चरणी आमचा कोटी कोटी प्रणाम. हे माते, आमच्या जीवनातील अंधार दूर कर. आमच्या मनातील भीती, चिंता आणि नकारात्मक विचार दूर करण्यासाठी आम्हाला बळ दे. संकटांचा सामना करण्याचे धैर्य दे आणि प्रत्येक कठीण प्रसंगातून योग्य मार्ग शोधण्याची बुद्धी दे. आमच्या घरात सुख, शांती, प्रेम आणि समाधान नांदू दे. कुटुंबातील सर्वांना उत्तम आरोग्य, सद्बुद्धी आणि आनंद लाभू दे. दुःखी माणसांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण होऊ दे. गरजूंच्या मदतीसाठी आमचे हात सदैव पुढे राहू दे. हे माते, आमच्या मनातील अहंकार दूर कर. आमच्याकडून कोणाचेही वाईट होऊ नये. सर्वांशी प्रेमाने वागण्याची आणि सत्याच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा दे. तुझ्या कृपेने आमच्या जीवनात धैर्य, समाधान आणि सकारात्मकता नांदू दे. जय माँ कालरात्री! जय आदिशक्ती! जय माता दी! ₹८ सातव्या माळेचा सुंदर संदेश नवरात्रीची सातवी माळ आपल्याला आठवण करून देते की अंधाराला घाबरायचे नसते, तर त्यातून प्रकाशाचा मार्ग शोधायचा असतो. संकटांना शाप समजण्याऐवजी त्यातून शिकण्याची संधी मानायची असते. आणि कितीही कठीण परिस्थिती आली, तरी मनातील श्रद्धा आणि माणुसकी जपायची असते. करड्या रंगाच्या या पवित्र दिवशी माँ कालरात्रीच्या चरणी नतमस्तक होऊन आपण एकच संकल्प करूया – मनातील भीती दूर करूया, वाईट विचारांवर विजय मिळवूया आणि प्रेम, श्रद्धा व धैर्याने जीवन जगूया. नवरात्री हा आदिशक्तीच्या उपासनेचा, भक्तीचा, श्रद्धेचा आणि शक्तीच्या जागराचा पवित्र उत्सव आहे. नऊ दिवस आपण देवीच्या नऊ रूपांची मनोभावे पूजा करतो. प्रत्येक दिवसाला एक विशेष महत्त्व आहे. प्रत्येक रंगामागे एक भावना, प्रत्येक पूजेमागे एक श्रद्धा आणि प्रत्येक देवीच्या रूपामागे एक दिव्य संदेश दडलेला आहे. नवरात्रीच्या सातव्या माळेला माँ कालरात्री देवीची पूजा केली जाते. माँ कालरात्री हे दुर्गा मातेचे सातवे स्वरूप असून त्या दुष्ट शक्तींचा नाश करणाऱ्या, भक्तांचे भय दूर करणाऱ्या आणि संकटांपासून संरक्षण करणाऱ्या देवी म्हणून पूजल्या जातात. नवरात्रीच्या सातव्या दिवसाचा रंग करडा मानला जातो. करडा रंग हा गंभीरता, स्थिरता, संयम आणि प्रतिकूल परिस्थितीतही धैर्याने उभे राहण्याची प्रेरणा देणारा रंग मानला जातो. या रंगातून आपल्याला जीवनातील सुख–दुःख, चढ–उतार आणि संकटांचा सामना शांत मनाने करण्याचा संदेश मिळतो. माँ कालरात्री यांचे स्वरूप अत्यंत तेजस्वी, सामर्थ्यशाली आणि भक्तांचे रक्षण करणारे आहे. त्यांचा वर्ण गडद आहे, केस विस्कटलेले आहेत आणि त्यांच्या गळ्यात विद्युल्लतेप्रमाणे चमकणारी माळ असल्याचे वर्णन धार्मिक ग्रंथांत आढळते. त्यांचे रूप उग्र असले, तरी भक्तांसाठी त्या अत्यंत ममतामयी आणि कल्याणकारी आहेत. त्यांना चार हात असल्याचे वर्णन आहे. एका हातात खड्ग, दुसऱ्या हातात लोखंडी अस्त्र, तर इतर दोन हात अभयमुद्रा आणि वरदमुद्रेत असल्याचे मानले जाते. त्यांचे वाहन गर्दभ म्हणजे गाढव आहे. माँ कालरात्रीचे उग्र रूप हे वाईट शक्तींचा नाश करण्यासाठी आहे. त्यांच्या अभयमुद्रेतून भक्तांना निर्भयतेचा आशीर्वाद मिळतो, तर वरदमुद्रेतून सुख, समृद्धी आणि कल्याणाची भावना व्यक्त होते. आईचे रूप जरी उग्र असले, तरी तिचे हृदय भक्तांसाठी प्रेमाने भरलेले आहे. जी माता दुष्टांचा संहार करते, तीच आपल्या लेकरांवर मायेची सावली धरते. 'कालरात्री' या नावाचा अर्थ काळोख्या रात्रीशी आणि काळाच्या अथांग शक्तीशी जोडला जातो. धार्मिक मान्यतेनुसार, देवी आपल्या दिव्य शक्तीने अज्ञान, भय, नकारात्मकता आणि दुष्ट प्रवृत्तींचा नाश करतात. कालरात्री माता आपल्याला शिकवतात की अंधार कितीही गडद असला, तरी श्रद्धेचा दिवा विझू देऊ नये. आयुष्यात कितीही संकटे आली, तरी मनातील विश्वास, धैर्य आणि सकारात्मकता टिकवून ठेवावी. जीवनात कधी दुःख येते, कधी अपयश येते, तर कधी आपली माणसेही साथ सोडतात. अशा वेळी मातेचे स्मरण आपल्याला मानसिक बळ देते. तिची भक्ती आपल्याला संकटांपासून पळण्याऐवजी त्यांचा सामना करण्याची प्रेरणा देते.

# नवरात्रीची आठवी माळ जांभळा रंगाची ;माता महागौरीची पूजा

नवरात्री हा आदिशक्ती माता दुर्गेच्या उपासनेचा, भक्तीचा, श्रद्धेचा आणि शक्तीच्या जागराचा पवित्र उत्सव आहे. नवरात्रीच्या नऊ दिवसांत देवीच्या नऊ रूपांची पूजा केली जाते. प्रत्येक दिवसाला विशेष महत्त्व असते. या काळात अनेक भक्त देवीला आवडणाऱ्या रंगांची वस्त्रे परिधान करतात, फुलांची सजावट करतात आणि भक्तिभावाने देवीची आराधना करतात. नवरात्रीच्या आठव्या माळेचा रंग जांभळा असेल, तर हा रंग आध्यात्मिकता, अंतर्मनाची शक्ती, श्रद्धा आणि सकारात्मकतेचे प्रतीक मानला जातो. मात्र, नवरात्रीतील प्रत्येक दिवसाचा रंग हा परंपरा, पंचांग आणि वर्षानुसार बदलू शकतो. त्यामुळे जांभळा रंग हा आठव्या दिवसाचा सार्वत्रिक किंवा शास्त्राने निश्चित केलेला रंग आहे, असे म्हणता येत नाही. नवरात्रीच्या आठव्या दिवसाला महाअष्टमी किंवा दुर्गाष्टमी असे म्हणतात. या दिवशी प्रामुख्याने माता महागौरीची पूजा केली जाते. काही प्रादेशिक परंपरांमध्ये अष्टमीला चामुंडा किंवा दुर्गामातेच्या इतर रूपांचीही विशेष आराधना केली जाते. माता महागौरी ही नवदुर्गेच्या नऊ स्वरूपांपैकी आठवी देवी आहे. तिचे रूप अत्यंत तेजस्वी, शांत, निर्मळ आणि करुणामय मानले जाते. माता महागौरी ही भगवान शिवाची पत्नी पार्वतीचे एक पवित्र स्वरूप आहे. 'महागौरी' या नावाचा अर्थ महान गौरवर्ण असलेली, तेजस्वी आणि पवित्र स्वरूपाची देवी असा होतो. धार्मिक मान्यतेनुसार, माता महागौरी भक्तांच्या जीवनातील दुःख, संकटे आणि नकारात्मकता दूर करून त्यांच्या जीवनात सुख, शांती आणि समृद्धी आणते. महागौरीची उपासना केल्याने मनातील भीती कमी होते, मनाला शांतता मिळते आणि कठीण परिस्थितीला सामोरे जाण्याचे बळ प्राप्त होते, अशी भक्तांची श्रद्धा आहे.

जांभळ्या रंगाचे आध्यात्मिक महत्त्व

नवरात्रीच्या आठव्या दिवशी जांभळा रंग धारण करण्याची परंपरा काही प्रचलित रंगयाद्यांमध्ये आढळते. हा रंग राजेशाही, आत्मविश्वास, आध्यात्मिक उन्नती आणि अंतर्मनातील स्थैर्य यांच्याशी जोडला जातो. जांभळ्या रंगामध्ये निळ्या रंगाची शांतता आणि लाल रंगाची ऊर्जा यांचा सुंदर संगम असल्याचे प्रतीकात्मकरीत्या सांगितले जाते. त्यामुळे हा रंग भक्ती, विवेक आणि आत्मिक शक्तीची आठवण करून देतो.

माता महागौरीचे स्वरूप कसे आहे?

माता महागौरीच्या मूर्तीचे आणि चित्राचे वर्णन अत्यंत सुंदर आहे.

शुभ्र वर्ण: देवीचे शरीर शंख, चंद्र आणि शुभ्र फुलांप्रमाणे तेजस्वी असल्याचे वर्णन केले जाते.

चार हात: देवीच्या चार हातांत त्रिशूळ, डमरू अशी आयुधे दाखवली जातात; इतर हात आशीर्वाद आणि अभयमुद्रेत असतात. शुभ्र वस्त्रे: देवी पांढरी किंवा शुभ्र वस्त्रे धारण केलेली दाखवली जाते. वृषभावर स्वार: देवीचे वाहन पांढरा वृषभ म्हणजेच बैल मानले जाते. शांत आणि प्रसन्न मुख: तिच्या मुखावर करुणा, माया आणि भक्तांबद्दल वात्सल्य दिसते. माता महागौरीचे हे स्वरूप पवित्रता, क्षमा, दया आणि अंतःकरणाच्या शुद्धीचे प्रतीक मानले जाते.

माता महागौरीची पौराणिक कथा

पौराणिक कथेनुसार, देवी पार्वतीने भगवान शिवांना पती म्हणून प्राप्त करण्यासाठी कठोर तपश्चर्या केली. दीर्घकाळ तपश्चर्या केल्यामुळे तिचे शरीर धुळीने आणि मातीने माखले होते. तिच्या तपश्चर्येने प्रसन्न होऊन भगवान शिवांनी तिच्यावर गंगाजलाचा अभिषेक केला, अशी एक प्रचलित कथा सांगितली जाते. या पवित्र स्नानानंतर देवीचे रूप अत्यंत तेजस्वी आणि गौरवर्ण झाले. तेव्हापासून तिला 'महागौरी' असे नाव प्राप्त झाले, अशी श्रद्धा आहे. या कथेचा आध्यात्मिक संदेश अत्यंत सुंदर आहे. मनुष्याच्या जीवनात कितीही संकटे आली, कितीही अडचणी निर्माण झाल्या,



तरी संयम, श्रद्धा, प्रामाणिक प्रयत्न आणि भक्ती यांच्या बळावर जीवनात नवी पहाट उगवू शकते.

माता महागौरी आपल्याला शिकवते की बाह्य सौंदर्यापेक्षा मनाची निर्मळता, विचारांची शुद्धता आणि इतरांबद्दल असलेली करुणा अधिक महत्त्वाची आहे. आठव्या माळेला

माता महागौरीची पूजा कशी करावी?

माता महागौरीची पूजा घरच्या घरी साध्या पद्धतीने आणि मनापासून करता येते. सकाळी लवकर उठून स्नान करावे आणि स्वच्छ वस्त्रे परिधान करावीत. देवघर स्वच्छ करून माता दुर्गा किंवा महागौरीची प्रतिमा स्थापित करावी. देवीसमोर तुपाचा दिवा लावावा आणि धूप किंवा अगरबत्ती दाखवावी. देवीला पांढरी फुले, अक्षता, कुंकू आणि आपल्या परंपरेनुसार पूजेचे साहित्य अर्पण करावे. जांभळ्या रंगाची फुले किंवा वस्त्र उपलब्ध असल्यास श्रद्धेने अर्पण करू शकता; ते बंधनकारक नाही. नारळ, खीर किंवा इतर सात्त्विक नैवेद्य अर्पण करावा. माता महागौरीच्या मंत्राचा जप करून देवीची आरती करावी. शेवटी आपल्या कुटुंबाच्या सुखासाठी, आरोग्यासाठी, शांतीसाठी आणि सर्वांच्या कल्याणासाठी प्रार्थना करावी. देवीच्या पूजेमध्ये महागडे साहित्य असणे आवश्यक नाही. श्रद्धा, शुद्ध भावना आणि दुसऱ्यांबद्दल आदर हीच खरी भक्ती आहे. नवरात्रीच्या आठव्या दिवशी माता महागौरीची उपासना करताना आपण केवळ देवीकडे सुख–समृद्धी मागू नये, तर स्वतःच्या जीवनात चांगले बदल घडवण्याचाही संकल्प करावा. मनातील राग, मत्सर आणि द्वेष कमी करण्याचा प्रयत्न करावा. आई–वडील, ज्येष्ठ व्यक्ती आणि महिलांचा आदर करावा. गरजू व्यक्तींना शक्य तेवढी मदत करावी. कठीण प्रसंगात निराश न होता धैर्याने पुढे जावे. कुटुंबामध्ये प्रेम, एकता आणि परस्पर विश्वास वाढवावा.

चुकीच्या गोष्टींची जाणीव झाल्यास त्या सुधारण्याचा प्रयत्न करावा. माता महागौरीची भक्ती आपल्याला आठवण करून देते की खरी शुद्धता ही मनात असते. मन निर्मळ असेल, विचार सकारात्मक असतील आणि कृती चांगली असेल, तर जीवन अधिक सुंदर बनते. आठव्या माळेसाठी जांभळ्या रंगाची साडी, ड्रेस किंवा कुर्ता परिधान करता येईल. देवघरात जांभळी फुले, स्वच्छ वस्त्र आणि पितळी समई यांची साधी सजावट सुंदर दिसते. देवीच्या प्रतिमेसमोर जांभळ्या आणि पांढऱ्या रंगांची फुलांची मांडणी केल्यास ती विशेष आकर्षक दिसू शकते. पांढरा रंग महागौरीच्या पारंपरिक स्वरूपाचे प्रतीक आहे, तर जांभळा रंग या दिवसाच्या प्रचलित रंगपरंपरेशी जोडला जाऊ शकतो. सजावट करताना सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्वच्छता, साधेपणा आणि भक्तिभाव. जय माता महागौरी! जय माता दुर्गा! नवरात्रीची आठवी माळ जांभळ्या रंगाची मानली जात असलेल्या प्रचलित परंपरेनुसार, हा दिवस माता महागौरीच्या उपासनेशी जोडला जातो. नवदुर्गेतील आठवे स्वरूप असलेली महागौरी ही पवित्रता, शांती, करुणा आणि नव्या सुरुवातीचे प्रतीक आहे. जांभळा रंग परिधान करून, देवीला फुले अर्पण करून, मंत्रजप आणि प्रार्थना करून आपण हा दिवस भक्तिभावाने साजरा करू शकतो. मात्र, नवरात्रीचे रंग आणि पूजेच्या तारखा स्थानिक परंपरा व पंचांगानुसार बदलू शकतात. आई महागौरी सर्वांच्या जीवनात सुख, शांती, समृद्धी आणि उत्तम आरोग्य देवो, हीच तिच्या चरणी प्रार्थना!

**जय माता दी**

### स्कंधमाता ..

माळ पाचवी गुंफता<br>
रुप पंचमी जगन्माता<br>
स्नेह कुंभ सुधा तुडूंब<br>
ओसंडूनवाहते ममता

कर द्वया तू पद्माश्रिता<br>
यशस्विनी स्कंध माता<br>
श्रीशुभदीस्तुसदादेवी<br>
सुखानंदे सिंहासनगता

आजचा महा शुभयोग<br>
साजरी पंचमी ललिता<br>
आश्विनशुक्ल पंचमीस<br>
महत्व असे उपांग व्रता

करंडकाची पूजा चाले<br>
साधक सिध्द स्वागता<br>
शुध्द मने भक्ती संपदा<br>
फलश्रुती दे अभ्यागता

स्कंद कुमार भगवंता<br>
काखेत घेता आश्रिता<br>
दुःख भय भंजन होते<br>
आदिशक्ती शरणागता

सूर्य मंडळ अधिष्ठात्री<br>
प्रभा मंडल संयोगिता<br>
भजन कीर्तनात दंगले<br>
महत्व नृत्यगानसंगिता

हरपले भान भक्ती रंगे<br>
गरबा दांडिया खेळता<br>
नर नारी भेद विरघळी<br>
उत्साहअंगी सळाळता

नमस्तस्यै गं नमस्तस्यै<br>
माता रूपेण संस्थिता<br>
षोडशोपचारविधी पूजे<br>
विशुद्धचक्र अवस्थिता

नियंत्रित अवांतर खर्चा<br>
मदतकरे दुष्काळग्रस्ता<br>
आनंदोत्सव तेंव्हा सार्थ<br>
करी संमिलित समस्ता

**– हेमंत मुसरीफ पुणे**<br>
**९७३०३०६९९६**

# रावण दहनाचा शुभ मुहूर्त, पूजा आणि या सणाशी संबंधित ५ महत्त्वाच्या गोष्टी

सनातन धर्मात असत्यावर सत्याचा आणि अधर्मावर धर्माचा विजय म्हणून विजयादशमी म्हणजेच दसऱ्याचा पवित्र सण अत्यंत उत्साहात साजरा केला जातो. या दिवशी देशभरात भगवान श्रीरामाच्या विजयाप्रीत्यर्थ रावण, कुंभकरण आणि मेघनाद यांच्या पुतळ्यांचे दहन केले जाते. या वर्षी रावण दहनाचा नेमका शुभ मुहूर्त कोणता आहे, याबाबत लोकांमध्ये मोठी उत्सुकता असते. पंचांगानुसार, वर्ष २०२६ मध्ये दसऱ्याचा हा सण २० ऑक्टोबर २०२६, मंगळवार रोजी साजरा केला जाणार आहे. या दिवशी दुपारी १२:५० वाजता नवमी तिथी समाप्त होईल, त्यानंतर लगेचच दशमी तिथी सुरू होईल.

**रावण दहनाचा योग्य वेळ आणि संध्याकाळचा मुहूर्त**



दसऱ्याच्या दिवशी रावण दहन नेहमी प्रदोष काळ म्हणजेच सूर्यास्ताच्या वेळी करणे अत्यंत उत्तम मानले जाते. पंचांगानुसार, २० ऑक्टोबर रोजी सूर्यास्त संध्याकाळी ०५:४७ वाजता होईल. त्यामुळे रावण दहनाचा सर्वात उत्तम काळ संध्याकाळी ०५:४७ वाजता ते रात्री ०८:२३ वाजेपर्यंत असेल.

विजयादशमीशी संबंधित ५ मोठ्या गोष्टी आणि नियम

१. शस्त्र पूजा आणि अपराजिता पूजन विजयादशमीच्या दिवशी माता दुर्गा आणि भगवान श्रीरामाच्या पूजेसह शस्त्रपूजा करण्याचे विशेष विधान आहे. याशिवाय, ईशान्य दिशेला जाऊन अपराजिता वनस्पतीची पूजा करणे आणि शमीच्या वृक्षाचे दर्शन घेणे जीवनात यश व विजयाचे प्रतीक मानले जाते.

२. नीलकंठ पक्षाच्या दर्शनाचे महत्त्व धार्मिक मान्यतेनुसार, दसऱ्याच्या दिवशी नीलकंठ पक्षाचे दर्शन घेणे अतिशय शुभ आणि भाग्यवान मानले जाते. असे मानले जाते की या दिवशी नीलकंठ पाहिल्यास व्यक्तीचे सर्व संकट दूर होतात आणि अडकलेली कामे वेगाने पूर्ण होऊ लागतात.

३. वाईटाचा त्याग आणि नवीन सुरुवातीचा संकल्प केवळ पुतळे जाळण्यासोबतच हा सण आपल्याला आपल्यातील अहंकार, क्रोध, लोभ आणि वाईट प्रवृत्तींचा त्याग करण्याची प्रेरणा देतो. दसऱ्याचा खरा संदेश हाच आहे की आपण सत्य व सदाचाराच्या मार्गावर चालून जीवनात सकारात्मक बदल घडवून आणले पाहिजेत.

४. शमी वृक्षाचे पूजन पौराणिक कथेनुसार, दसऱ्याच्या दिवशी शमीच्या पानांचे आदान–प्रदान करणे आणि त्याचे पूजन करणे समृद्धीचे प्रतीक मानले जाते. यामुळे घरात सुख–शांति नांदते.

५. नवीन कार्याची सुरुवात विजयादशमी हा साडेतीन मुहुर्तांपैकी एक मानला जातो. या दिवशी नवीन व्यवसाय, वाहन खरेदी किंवा कोणत्याही शुभ कार्याची सुरुवात करणे अत्यंत फलदायी ठरते.

# 'धक धक गर्ल'चा गुलाबी साडीत घायाळ करणारा लूक

अभिनेत्री माधुरी दीक्षितने आपल्या सौंदर्याच्या जोरावर बॉलिवूड इंडस्ट्रीवर अधिराज्य गाजवले आहे. अभिनय आणि डान्सच्या माध्यमातून प्रकाशझोतात राहणाऱ्या माधुरीच्या नव्या फोटोंची सोशल मीडियावर जोरदार चर्चा सुरू आहे. सध्या अभिनेत्रीचे फोटो सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. माधुरी दीक्षित सध्या चाहत्यांना नव्या भूमिकेत पाहायला मिळत आहे. अभिनय आणि डान्सच्या माध्यमातून चर्चेत राहणारी माधुरी आता 'कोण होणार करोडपती'चं





होस्टिंग करत आहे. पहिल्यांदाच अभिनेत्री नव्या भूमिकेत दिसतेय. या शोनिमित्त अभिनेत्री गुलाबी रंगाच्या साडीमध्ये एकदम खास फोटोशूट केले आहे. गुलाबी रंगाची जॉर्जट साडी नेसून सुंदर फोटोशूट केले आहे. फुल्ल स्लिव्हज असलेलं ब्लाऊज कॅरी करत अभिनेत्रीने आपला संपूर्ण लूक केलेला आहे. अभिनेत्रीच्या निस्सिम सौंदर्याची चाहत्यांमध्ये जोरदार चर्चा होत आहे. स्टायलिश ओपन हेअर, ग्लॉसी मेकअप, स्टायलिश लूक करत अभिनेत्रीने सर्वांचेच लक्ष वेधले आहे. माधुरी दीक्षितचा मोठ्या प्रमाणावर चाहतावर्ग आहे. फॅन्समध्ये कायमच तिच्या सौंदर्याची जोरदार चर्चा असते. 'कोण होणार करोडपती'च्या शोनिमित्त माधुरी सध्या स्टायलिश लूक करत सोशल मीडियावर खास फोटोशूट करत असते. तिच्या फॅशनची आणि सौंदर्याची कायमच चाहत्यांवर भुरळ पडलेली आहे. गुलाबी साडीमध्ये शेअर केलेल्या फोटोवर चाहत्यांकडून माधुरीच्या लूकचे कौतुक केले जात आहे. अभिनेत्रीच्या फोटोंवर चाहत्यांकडून प्रेमाचा वर्षाव केला जात आहे.

# दांड्या गरबा खेळण्यास वेळेची मर्यादा वाढवली

ठाणे: गरबा आणि रास दांडियाप्रेमींसाठी महत्त्वाची बातमी आहे. नवरात्रीचे सध्या शेवटचे काही दिवस शिल्लक राहिले आहेत. ठाणे जिल्हा प्रशासनाने गरबाप्रेमी आणि रास दांडियाप्रेमींसाठी वेळेमध्ये वाढ केली आहे. नवरात्रीचे उरलेले शेवटचे तीन दिवस मध्यरात्री १२ दिवस ध्वनिक्षेपकासह वाजवण्यासाठी नागरिकांना आणि गरबा आयोजकांना आता परवानगी दिली आहे. खरं तर, सरकारने नवरात्रीच्या दिवसांमध्ये गरबा आयोजकांना रात्री १० वाजेपर्यंतच ध्वनिक्षेपक वाजवण्यासाठी परवानगी दिली होती. पण नवरात्रीच्या शेवटच्या काही दिवसांमध्येच ठाणे जिल्हा प्रशासनाने वेळेमध्ये वाढ करण्याची मंजुरी दिली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी **जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका, संभाजीनगर ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र)** येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिध्द केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ✻ यांची राहील. **संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी** (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO.MHMAR/26/A4110 **मो.न.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२२**

पान ४ वरून... पान ४ वरून... पान ४ वरून...

## जिल्हा परिषदेच्या शिक्षिकांचा

मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. या उपक्रमामुळे जिल्हा परिषदेच्या उपक्रमशील शिक्षिकांना मोठा आधार मिळाला असून, शाळांचा कायापालट करण्यासाठी यशस्विनी बचत बँक एक महत्त्वाचा दुवा ठरेल, असा विश्वास याप्रसंगी व्यक्त करण्यात आला. या यशस्विनी महिला ज्यांचा मोलाचा वाटा आहे त्या आहेत डॉ. प्रफुल्लता भिंगोले मॅडम, ललिता पाटील मॅडम,स्वाती चित्ते मॅडम चारुशीला इंगळे मॅडम, प्रतिभा खरात मॅडम, सुमन गव्हाणे मॅडम, आशा जैवाळ मॅडम, सीमा जाधव मॅडम, सुमन डोंगरे मॅडम, जिजा वाघ मॅडम, पुष्पा कावरे मॅडम.

## भोकरदन पोलिसांची दमदार

सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष माने तसेच पोलीस अंमलदार इंदल बमनावत, दीपक इंगळे आणि प्रदीप टेकाळे यांच्या पथकाने ही कामगिरी पार पाडली. भोकरदन पोलिसांच्या या कामगिरीमुळे नागरिकांना दिलासा मिळाला असून, हरवलेले मोबाईल शोधण्यासाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर होत असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले आहे.

## भोकरदन तालुक्यात गांजाची

यांनी केली असून, पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष माने करीत आहेत. जप्त मुद्देमाल : गांजाची दोन ओलसर झाडे (एकूण वजन ७.२२० किलो), गांजाच्या झाडाजवळील माती आणि शेतातील माती. पोलिसांच्या नोंदीनुसार एकूण मुद्देमालाची किंमत ३ लाख ६१ हजार रुपये आहे.

## श्रीष्टी तांडा येथे भव्य

मदत एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा हा उपक्रम ग्रामीण नागरिकांच्या दृष्टीने उपयुक्त ठरला.

**सामाजिक बांधिलकीतून जनसेवेचा उपक्रम**

नागरिकांचे आरोग्य, गरजू व्यक्तींना शासकीय योजनांचा लाभ आणि ग्रामीण भागातील सामाजिक प्रश्न यांना प्राधान्य देत नायक प्रतिष्ठाण व ग्रामपंचायत कार्यालय, श्रीष्टी तांडा यांच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात आला. शासकीय यंत्रणा, आरोग्य संस्थांच्या सहकार्याने गावपातळीवर अशा प्रकारची शिबिरे आयोजित केल्यास नागरिकांना वेळेवर आरोग्य तपासणी करता येते आणि विविध योजनांसाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यास मदत होते. त्यामुळे भविष्यातही नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन आरोग्य व सामाजिक कल्याणविषयक उपक्रम राबविण्याचे महत्त्व अधोरेखित झाले. श्रीष्टी तांडा येथे पार पडलेल्या या शिबिरातून आरोग्यसेवा आणि सामाजिक सुरक्षा यांची सांगड घालण्याचा प्रयत्न करण्यात आला. नागरिकांना त्यांच्या गावातच तपासणी आणि शासकीय योजनांसाठी मार्गदर्शन मिळाल्याने या उपक्रमाचे महत्त्व वाढले आहे. आरोग्याची काळजी, गरजूंची सेवा आणि शासकीय योजनांचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या सामाजिक बांधिलकीतून हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला.

## शिक्षक, पालकांनी मुलांचा ' कल

अरुण वावरे,के. एस. वाकोडे यांनी मनोगत व्यक्त केले. उपमुख्याध्यापक राऊत यांनी अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बालाजी ढोबळे यांनी केले.सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन श्रीमती सविता अवसरमोल यांनी केले.पसायदानाने मेळाव्याची सांगता झाली. मेळाव्याला पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुलांचा कल नेमका कुठले शिक्षण घेण्यासाठी आहे ? खेळाकडे आहे की एखाद्या विशिष्ट अभ्यासक्रमाकडे हे तपासण्यासाठी कल चाचणी देखील घेतली जाते. यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या आवडीचे क्षेत्र निवडून करिअर घडविणे आणखी सुलभ होते.

## समान काम, समान वेतनासाठी

त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण असतानाही वेतनवाढीचा प्रश्न प्रलंबित असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. दोन वर्षांपासून प्रस्ताव प्रलंबित समान स्वरूपाचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना समान वेतन मिळावे आणि उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनवाढीचा लाभ मिळावा, ही न्यायालयीन कर्मचाऱ्यांची प्रमुख मागणी आहे. संबंधित प्रस्ताव शासन स्तरावर अंतिम मंजुरीच्या प्रतीक्षेत जवळपास दोन वर्षांपासून प्रलंबित असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे या प्रश्नावर शासनाने तातडीने निर्णय घेऊन कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

आंदोलनाची पुढील दिशा निश्चित

प्रलंबित मागणीच्या पूर्ततेसाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचे पुढील टप्पे निश्चित केले आहेत. त्यानुसार १६ व १७ ऑक्टोबर रोजी काळ्या फिती लावून निषेध नोंदविण्यात आला. त्यानंतर ५ नोव्हेंबर रोजी सामूहिक रजा घेऊन आंदोलन करण्यात येणार असून, १७ नोव्हेंबर २०२६ पासून मागण्या मान्य होईपर्यंत बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे. शासनाने या आंदोलनाची गांभीर्याने दखल घेऊन समान काम–समान वेतन आणि उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनवाढीच्या मागणीसंदर्भातील प्रलंबित प्रस्तावाला अंतिम मंजुरी द्यावी, अशी अपेक्षा न्यायालयीन कर्मचाऱ्यांकडून व्यक्त होत आहे. आता शासन या मागण्यांबाबत कोणती भूमिका घेते, याकडे राज्यातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## नवरात्रीत कडेगावच्या युवकांचा

सादरीकरणाला माता–भगिनींसह ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. इतिहासाचा अभिमान नव्या पिढीपर्यंत! नवरात्रीसारख्या धार्मिक उत्सवाच्या माध्यमातून मनोरंजनासोबतच महाराष्ट्राचा गौरवशाली इतिहास, छत्रपती संभाजी महाराजांचे शौर्य आणि सांस्कृतिक वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न कडेगावच्या युवकांनी केला. युवकांच्या या उपक्रमाचे ग्रामस्थांकडून कौतुक होत असून, संस्कृती आणि इतिहासाविषयी अभिमान जागवणारा हा उपक्रम प्रेरणादायी ठरला आहे.

### शैलपुत्री ..

आगतम् सु स्वागतम्
प्रथम दिनी नवरात्री
देवीमाते तव स्वागते
आवाहन दाटले नेत्री

फाकला पुन्हा प्रकाश
सरलीअवस सर्वपित्री
गरबादांडिया खेळाया
उत्साहीत गं पुत्र प्रौत्री

त्रिशूल धरी एक हाती
पहिली माळ शैलपुत्री
असूरीवृत्ती वधकराय
त्राही माम् असे खात्री

कमल पुष्प दुजे हाती
निर्मलता यावी चरित्री
द्वेष असूया दोष टळो
सुखानंदे न्हावोधरित्री

धवल शालूत उज्वला
रे प्रभा उजळली क्षेत्री
भक्तावरी अदृश्यरुपा
तव अखंड कृपा छत्री

वृषभारूढ जगन्माता
करे शक्ती प्रदान गात्री
निर्मळ करे मनआमचे
कृपा सरिता तू गायत्री

यथा शक्ती करी भक्ती
दानधर्म अल्पसत्पात्री
उपचार न जाणे अति
गोड मान ही सेवापत्री

**– हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

### ब्रह्मचारिणी माता ..

दुसरी माळ वाहिली
नवरात्री महोत्सवात
आई तुझ्या ममतेत
प्रेमात भिजली वात

दुर्गा माता रे भावली
ब्रह्मचारिणी रूपात
निर्जळी राही आई
किती कठोर तपात

डाव्याहाती कमंडलू
माळउजव्या हातात
श्रध्दाभाव हवाअसा
रममाण होता व्रतात

बेल पत्री खाई फक्त
अपर्णा राहते वनात
साक्षात वैराग्यमुर्ती
ठसली शंभो मनात

पार्वती नि उमापती
जन्मोजन्म देई साथ
श्रध्दामय येता भक्त
सुखादुःखा देई हात

डोके तुझ्या पायावर
डोक्यांवर तुझा हात
मुर्ती उमाई ठसलेली
राहली नित्यअंतरात

ब्रह्मचारिण्यै नम:
जप घुमावा अधरात
लक्षसूर्य लकाकतात
सुपंथ दावी अंधारात

**– हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

### चंद्रघंटा ..

चंद्र घंटा अवतारी
दुर्गा जागे नवराती
चंद्र कोर मुकूटात
उजळे लक्ष ज्योती

दहाभुजा महादेवी
आयुधे शोभे हाती
सिंहारूढ रुप तुझे
असूरांस महाभिती

रूप तुझे साठवता
स्थिरावली मंदमति
रूप तुझे आठवता
भजन स्तोत्रे रमती

जयघोष उदेउदेचा
संतृप्तेची अनुभूति
महायज्ञ भक्तीयोग
माथीलावा विभूति

गं कमलपुष्पे हाती
भक्तवर अति प्रिती
त्रिशूल करारी करी
जातुकासूराचे प्रति

लीन चरणी साधक
पाठगाती सप्तशती
चंद्र समान शीतला
कृपाळु तू महासती

जाणीव हो अंतरात
महाशक्ती तू पार्वती
अधिक सशक्तनारी
जरी कटु परिस्थिती

**– हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# जिल्हास्तरीय इंग्लिश वक्तृत्व स्पर्धेत दानापूरच्या अनम शेखचे घवघवीत यश

## प्रभावी वक्तृत्वाने पटकावला द्वितीय क्रमांक; जिल्हा परिषद उर्दू हायस्कूलच्या शिरपेचात मानाचा तुरा

दानापूर : शिक्षण विभाग, जिल्हा परिषद जालना, मारवाडी युवा मंच अंबड व रोटरी क्लब जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय इंग्लिश वक्तृत्व स्पर्धेत जिल्हा परिषद उर्दू हायस्कूल, दानापूर येथील इयत्ता दहावीतील विद्यार्थिनी अनम सलीम शेख हिने द्वितीय क्रमांक पटकावत दानापूरच्या शैक्षणिक क्षेत्राचा नावलौकिक वाढविला.

ही जिल्हास्तरीय स्पर्धा दि. ७ ऑक्टोबर २०२६ रोजी जालना एज्युकेशन सोसायटीचे महाविद्यालय, जालना येथे मोठ्या उत्साहात पार पडली. जिल्ह्यातील विविध तालुक्यांतून तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळवून निवड झालेले विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी विविध सामाजिक, शैक्षणिक व समकालीन विषयांवर इंग्रजी भाषेत प्रभावीपणे आपली मते मांडली.

केंद्र,बीट व तालुकास्तरीय प्रवास करीत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या अनम सलीम शेख हिने जिल्हास्तरावरही आपल्या आत्मविश्वासपूर्ण व ओघवत्या इंग्रजी वक्तृत्वाने उपस्थितांची



मने जिंकली. तिच्या प्रभावी मांडणीला परीक्षकांकडून विशेष दाद मिळाली आणि तिने द्वितीय क्रमांकाचा बहुमान मिळविला. व विविध मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक स्वीकारले. अनमच्या या उल्लेखनीय यशामागे श्री. दळवी सर व श्री. शेख क्यू. वाय. यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थिनीच्या यशाबद्दल शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्री खरात साहेब यांनी तिचे विशेष कौतुक केले. तिच्या या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी मा. श्री. गजानन वाळके सर, स्पर्धा समन्वयक श्री. शेटे सर, केंद्रप्रमुख श्री. जंजाळ सर, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. शेख पप्पू शेख असद, उपाध्यक्ष श्री.शेख साबेर मोबीन, मुख्याध्यापक साजिद रंगरेज, सर्व शिक्षकवृंद व पालकांनी अनमचे अभिनंदन करून तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.ग्रामीण व उर्दू माध्यमातील विद्यार्थ्यांमध्येही इंग्रजी भाषेतील उत्कृष्ट वक्तृत्वाची क्षमता असून योग्य मार्गदर्शन व संधी मिळाल्यास ते जिल्हास्तरावरही उल्लेखनीय कामगिरी करू शकतात, हे अनम शेखच्या यशाने दाखवून दिले.

# मौजे बोरगाव खडक, खडकी, सिरसगाव वाघ्रळ,सावरखेडा, पिंपरी व ईटा येथील गावांची ई-पीक पाहणी DCS MH पद्धारे १००% पूर्ण - तालुक्यात अग्रेसर

हसनाबाद /प्रतिनिधी : महाराष्ट्र शासनाच्या महसूल व कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने खरीप हंगाम २०२५–२६ ची ई–पीक पाहणी DCS MH (Digital Crop Survey - Maharashtra) प व ई–पीक पाहणी पोर्टलच्या माध्यमातून सुरू आहे. या वर्षी दुष्काळाचे सावट असताना शेतकऱ्यांना *अनुदान, प्रधानमंत्री पीक विमा योजना, पीक कर्ज, अतिवृष्टी / दुष्काळी नुकसान भरपाई आणि इतर सर्व शासकीय योजनांचा लाभ* मिळण्यासाठी गाव नमुना नंबर १२ (पीक पेरा), ७/१२ आणि ८–अ वर पिकाची नोंद असणे बंधनकारक आहे. या पार्श्वभूमीवर हसनाबाद महसूल मंडळातील *मौजे बोरगाव खडक* येथील एकूण *८४६ पैकी ८४६* गटांची व *मौजे सावखेडा* येथील एकूण *९५७ पैकी ९५७* खडकी येथील एकूण ८१६ पैकी ८१६ व सिरसगाव वाघ्रुळ येथील एकूण १४८७ पैकी १४८७ व ईटा येथील एकूण ३१९ पैकी ३१९ पिंप्री येथील एकूण ९४० पैकी ९४० गटांची ई–पीक पाहणी शासनाने विहित




केलेल्या मुदतीत १००% पूर्ण करण्यात आली आहे. असे १००% उद्दिष्ट पूर्ण करणारे मौजे बोरगाव खडक, खडकी, सिरसगाव वाघ्रळ, ईटा, पिंप्री व सावखेडा हे भोकरदन तालुक्यातील गावे ठरले आहेत. *कामाचे स्वरूप :* यावर्षी ई–पीक पाहणीची सुविधा सुरुवातीला शेतकरी स्तरावर उपलब्ध नसल्याने ती पूर्णतः गाव पातळीवर नियुक्त करण्यात आलेल्या पीक पाहणी सहाय्यकांमार्फत करण्यात येत आहे. मौजे बोरगाव खडक येथे पीक पाहणी सहाय्यक *श्री. समाधान दगडूबा वानखेडे व श्री. राजू जोगदंडे* यांनी ऊउड चकपवर जीओ टॅगिंग, पीकाचे फोटो, क्षेत्र मोजणी आणि पीक प्रात्यक्षिकसह ८४६ गटांची नोंद पूर्ण केली. पीक पाहणी सहाय्यक *श्री. काकासाहेब जाधव* श्री गणेश अंभोरे श्री बबन वनारसे श्री कचरु इंगळे श्री ज्ञानेश्वर रजाळे श्री प्रल्हाद वानखेडे श्री मच्छिंद्र सहाने यांनी ही उल्लेखनीय कामगिरी *हसनाबाद मंडळाधिकारी श्री. के. टी. सोनवणे* यांच्या मार्गदर्शनाखाली, *ग्राम महसूल अधिकारी श्री. राजेंद्र पंडित, श्री. वैभव उदावत, श्री. गणेश गायकवाड, श्री. अविनाश चव्हाण, श्री. मंगेश सुंदर्डे* आणि तलाठी कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या विशेष नियोजन व परिश्रमातून पार पडली. भूमी अभिलेख अद्ययावत करणे, सातबारा संगणकीकरण, डिजिटल स्वाक्षरी व पिक पेरा प्रमाणीकरण या प्रक्रियेत ई–पीक पाहणी हा महत्त्वाचा टप्पा आहे. शेतकऱ्यांनी उर्वरित गावांमध्ये स्वतः हून ऊउड चकपवर नोंदणी करून सहकार्य करावे, असे आवाहन महसूल प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.




# शिवसेनेतील अकार्यक्षम मंत्र्यांना डच्चू ?

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी मागवले रिपोर्टकार्ड

मुंबई : हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर मंत्रिमंडळातील फेरबदलांची चर्चा पुन्हा सुरू झाली असून, दसरा मेळाव्यानंतर शिवसेनेतील अकार्यक्षम मंत्र्यांना बाजूला करून नव्या चेहऱ्यांना संधी दिली जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंत्र्यांच्या कामकाजाचा आढावा घेण्याची तयारी केल्याचे राजकीय वर्तुळातून सांगितले जात आहे. अपेक्षित कामगिरी न करणाऱ्या मंत्र्यांना डच्चू देऊन तरुण आणि सक्रिय आमदारांना मंत्रिपदाची संधी देण्याबाबत हालचाली सुरू असल्याची चर्चा आहे. राज्यात महायुतीचे सरकार स्थापन होऊन दोन वर्षांचा कालावधी पूर्ण होत असताना शिंदे हे आपल्या पक्षातील काही मंत्र्यांच्या कामकाजाबाबत नाराज असल्याचे सांगितले जाते. मंत्र्यांच्या कामगिरीचा आढावा घेऊन त्यानुसार पुढील निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे. हिवाळी अधिवेशनापूर्वी प्रशासकीय कामकाजाला गती देणे आणि पक्षाची संघटनात्मक ताकद वाढवणे, या दृष्टीने मंत्रिमंडळात बदल करण्याचा विचार



सुरू असल्याचे राजकीय सूत्रांचे म्हणणे आहे. या संभाव्य फेरबदलात काही राज्यमंत्र्यांना पदोन्नती देऊन कॅबिनेट मंत्रिपदाची संधी मिळू शकते, अशीही चर्चा आहे. त्यामुळे शिवसेनेतील मंत्रिपदाची समीकरणे बदलण्याची शक्यता असून, नव्या नेतृत्वाला पुढे आणण्याचा प्रयत्न होऊ शकतो. दसऱ्यानंतर मंत्रिमंडळात 'भाकरी फिरवली' जाणार का, याकडे पक्षातील आमदारांचे लक्ष लागले आहे. आगामी राजकीय आव्हानांना सामोरे जाण्यासाठी पक्षांतर्गत समन्वय राखणे, कामकाजाचा वेग वाढवणे आणि सक्रिय नेतृत्वाला संधी देणे, या बाबी संभाव्य फेरबदलामागे असल्याचे मानले जात आहे. मंत्र्यांच्या कामगिरीचा आढावा, संभाव्य पदोन्नती किंवा मंत्रिपदावरून गच्छंती याबाबत सध्या अधिकृत तपशील समोर आलेला नसला, तरी दसरा मेळाव्यानंतर प्रत्यक्षात कोणते बदल होतात, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

पान १ वरून... पान १ वरून... पान १ वरून...

## नाफेड च्या विक्रीतुन होणारा नफा

दुष्काळाने पीक गेले; पुढच्या पेरणीसाठी आधार द्या जालना जिल्ह्यासह दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी आर्थिक अडचणीत आहेत. उत्पादन घटल्याने घरखर्च, मुलांचे शिक्षण आणि पुढील पेरणीसाठी पैसा उभा करण्याची चिंता त्यांना भेडसावत आहे. अशा वेळी ही मदत मिळाल्यास शेतकरी कुटुंबांना आधार मिळू शकतो, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. नाफेडकडून पीकनिहाय खरेदीदर, खरेदीचे प्रमाण, विक्रीदर, शिल्लक साठा आणि खर्चाचा हिशेब मागवावा. पुढे मालाची आणखी चांगल्या भावाने विक्री झाल्यास त्यातून मिळणारी अतिरिक्त निव्वळ रक्कमही शेतकऱ्यांच्या मदतीसाठी द्यावी, अशी मागणी खोतकर यांनी केली आहे. मदत थेट खात्यात; छोट्या शेतकऱ्यांना प्राधान्य शेतकऱ्यांना तातडीने दिलासा मिळावा म्हणून शासनाने प्राथमिक निधी उपलब्ध करावा. केंद्र शासनाची आवश्यक मान्यता घेऊन मदत थेट पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करावी. कमी जमीन असलेल्या आणि अधिक पीक नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना प्राधान्य द्यावे, असेही त्यांनी सुचविले आहे. अशा स्वरूपाची मागणी राज्यात सर्वप्रथम करणारे अर्जुनराव खोतकर हे एकमेव आमदार असल्याचा दावा त्यांच्या कार्यालयाने केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र शासनाकडे या प्रस्तावाचा प्राधान्याने पाठपुरावा करावा, अशी विनंती खोतकर यांनी केली आहे.

## मन हरिनामात तल्लीन

अखंड सुरू ठेवण्याचा आमचा संकल्प आहे. धर्म आणि संस्कृतीच्या कार्यासाठी एकत्र येणाऱ्या भाविकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांना सर्वतोपरी सहकार्य करण्याचा आमचा प्रयत्न राहील. असे या वेळी राहुल लोणीकर यांनी सांगितले यावेळी शत्रुघ्न कणसे, संपत टकले, रमेश भापकर, संदीप बाहेकर, प्रकाश चव्हाण, शहराध्यक्ष प्रवीण सातोनकर, शहाजी राक्षे, बाबासाहेब तेलगड, संभाजी वारे सोनू अग्रवाल, सतीश सोनवणे, इजरान कुरेशी, सावता काळे, सुबोध चव्हाण, संभाजी घनवट, शुभम तेलगड, विक्रम धुमाळ, माऊली विष्णू गायकवाड, कृष्णा आरगडे, विजय यादव, राजेश ढवळे, पिंटू काका ढवळे, नितीन जोगदंड, पृथ्वीराज अंभोरे, बंडू मानवतकर, अर्जुन जगताप, अर्जुन राठोड, मुन्ना चितोडा, वसंत राजबिंडे, दादू राक्षे, पद्माकर कवडे, रामप्रसाद गिरी, अजित पोरवाल, अमोल अग्रवाल, अमर बगडिया, प्रमोद राठोड यांच्यासह मोठ्या संख्येने महिला व पुरुष उपस्थित होते.

## सावरगाव घाट येथे १०

आवाहन केले आहे. यंदाच्या मेळाव्यासाठी भाविक आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असेही त्यांनी म्हटले आहे.

## देवी दहेगाव येथे रेणुका

सकाळी १० वाजता होमहवन होणार असून, मंगळवार, २० ऑक्टोबर रोजी नवरात्रोत्सवाची सांगता होणार आहे. या दिवशी सकाळी ७ ते ९ या वेळेत अन्नदान व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री रेणुका मातेच्या दर्शनासाठी तसेच धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घेण्यासाठी परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## श्री गणपती पतसंस्थेचा पुंगळे

भालेराव, ज्ञानेश्वर पुंगळे, कुंडलिकराव पुंगळे, राम पारवे, प्रभू कढवणे, योगीराज पुंगळे, संस्थेचे सरव्यवस्थापक अंकुश सुरासे, मुख्य शाखा व्यवस्थापक जयपालसिंग चव्हाण, राजूर शाखा व्यवस्थापक नारायण पारवे तसेच संस्थेचे कर्मचारी प्रभाकर मगर, परमेश्वर कुमकर, प्रशांत जाधव, सोपान पुंगळे आणि सुभाष कुमटे आदींची प्रमुख उपस्थिती होती. संस्थेच्या या संवेदनशील आणि गतिमान कामकाजाबद्दल परिसरातून मोठे कौतुक होत आहे.

# जिल्हा परिषदेच्या शिक्षिकांचा स्तुत्य उपक्रम; 'यशस्विनी बचत बँके'च्या माध्यमातून शाळांच्या विकासाला मिळणार बळ!

## पहिला निधी जि. प. प्रा. शाळा नवे भोकरदनच्या रंगरंगोटीसाठी चारुशीला इंगळे यांना सुपूर्द




भोकरदन:दि प्रतिनिधी– जिल्हा परिषद शाळांमध्ये विविध नाविन्यपूर्ण आणि उपक्रमशील कामे करताना अनेकदा निधीची कमतरता भासते. हीच अडचण ओळखून जिल्हा परिषदेच्या शिक्षिकांनी एकत्र येत 'यशस्विनी बचत बँक' या अनोख्या उपक्रमाची स्थापना केली आहे. या बँकेच्या माध्यमातून उपक्रमशील शिक्षकांच्या उपक्रमांसाठी व शाळेच्या कामांसाठी निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. या बँकेचा पहिला निधी जि. प. प्राथमिक शाळा नवे भोकरदन येथील शिक्षिका चारुशीला इंगळे मॅडम यांना शाळेच्या रंगरंगोटीच्या कामासाठी उपलब्ध करून देण्यात आला.

हा निधी वितरण कार्यक्रम नुकताच अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या प्रसंगी भोकरदन तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी गजानन वाळके , कन्या भोकरदन केंद्राचे केंद्रप्रमुख आर. एच. सोनुने , तसेच चांदई एक्को केंद्राचे केंद्रप्रमुख घायाळ सर यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थितांच्या हस्ते चारुशीला इंगळे मॅडम यांना शाळेच्या रंगरंगोटीसाठीचा धनादेश सुपूर्द करण्यात आला.

शिक्षिकांनी स्वयंप्रेरणेने एकत्र येत सुरु केलेल्या या 'यशस्विनी बचत बँके'च्या संकल्पनेचे व कार्याचे गटशिक्षणाधिकारी गजानन वाळके यांनी मन भरून कौतुक केले आणि सर्व शिक्षिकांना भावी वाटचाली (पान ३ वर)

# भोकरदन पोलिसांची दमदार कामगिरी! CEIR पोर्टलद्वारे १ लाख ४० हजारांचे हरवलेले मोबाईल शोधले

भोकरदन/सुरेश शेळके : भोकरदन तालुक्यातील नागरिकांचे हरवलेले आणि चोरीला गेलेले मोबाईल शोधून काढण्यात भोकरदन पोलिसांना पुन्हा एकदा मोठे यश मिळाले आहे. केंद्र सरकारच्या 'सेंट्रल इक्विपमेंट आयडेंटिटी रजिस्टर' (उएखठ) पोर्टलचा प्रभावी वापर करत पोलिसांनी तब्बल १ लाख ४० हजार रुपये किमतीचे विविध कंपन्यांचे मोबाईल शोधून काढले. शुक्रवार, दिनांक १६ ऑक्टोबर २०२६ रोजी हे मोबाईल त्यांच्या मूळ मालकांच्या स्वाधीन करण्यात आले. हरवलेले मोबाईल परत मिळाल्याने नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला असून, त्यांनी पोलिसांचे आभार मानले. नागरिकांचे मोबाईल हरवल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर भोकरदन पोलिसांनी संबंधित मोबाईलचे आयएमईआय (खचएख) क्रमांक उएखठ पोर्टलवर नोंदवून ते ब्लॉक करण्याची प्रक्रिया राबवली. सायबर सेल आणि पोलीस पथकाने तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे या मोबाईलचा माग काढला. महाराष्ट्रातील विविध भागांतून मोबाईल शोधून काढत ते मूळ मालकांपर्यंत पोहोचविण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. तेगबीर संधू, अपर पोलीस अधीक्षक डॉ. विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. नितीन कटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. भोकरदन पोलीस ठाण्याचे (पान ३ वर)




**मोबाईल हरवल्यास पोलिसांशी संपर्क साधा**

मोबाईल हरवल्यास किंवा चोरीला गेल्यास नागरिकांनी तातडीने जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवावी. तसेच केंद्र सरकारच्या उएखठ पोर्टलवर (https://ceir.sanchaar.gov.in) मोबाईल हरवल्याची नोंद करून आवश्यक प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन भोकरदन पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष माने यांनी केले आहे. जुना मोबाईल खरेदी करतानाही त्याची सत्यता आणि आयएमईआय क्रमांक तपासण्याचे आवाहन देखील करण्यात आले आहे.

# भोकरदन तालुक्यात गांजाची लागवड उघड; ३ लाख.६१ हजाराचा मुद्देमाल जप्त

## कोपर्डा शिवारातील शेतात पोलिसांची कारवाई; ७.२२० किलो ओला गांजा जप्त




भोकरदन । प्रतिनिधी : भोकरदन तालुक्यातील कोपर्डा शिवारात गांजाची लागवड केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. भोकरदन पोलिसांनी गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी १२.२५ वाजता शेतगट क्रमांक १०१ मध्ये कारवाई केली. या कारवाईत ७ किलो २२० ग्रॅम वजनाची गांजाची दोन ओलसर झाडे जप्त करण्यात आली असून, जप्त मुद्देमालाची एकूण किंमत ३ लाख ६१ हजार रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणी मधुकर किसन पाबळे (वय ४२, रा. कोपर्डा, ता. भोकरदन, जि. जालना) यांच्याविरुद्ध भोकरदन पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ५६३/२०२६ अन्वये एनडीपीएस कायदा १९८५ च्या कलम २०(ब)(ळळ)(क) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कोपर्डा शिवारातील संबंधित शेतात गांजाच्या झाडांची लागवड व संगोपन केल्याचे आढळून आले. कारवाईदरम्यान गांजाची दोन झाडे, तसेच गांजाच्या झाडाजवळील ओलसर माती आणि लागवड केलेल्या शेतातील माती नमुन्यादाखल जप्त करण्यात आली. या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक प्रकाश दशरथ शेळके यांनी फिर्याद दिली. गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही पोलीस उपनिरीक्षक प्रवीण सोनवणे

# श्रीष्टी तांडा येथे भव्य मोफत नेत्र व त्वचारोग तपासणी शिबिर उत्साहात संपन्न!



श्रीष्टी तांडा । प्रतिनिधी : ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासोबतच गरजू आणि निराधार व्यक्तींना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याच्या उद्देशाने श्रीष्टी तांडा येथे आयोजित भव्य मोफत नेत्र तपासणी व त्वचारोग तपासणी शिबिर शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६ रोजी उत्साहात पार पडले. मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष, जालना व गणपती नेत्रालय हॉस्पिटल, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने हनुमान मंदिर सभागृहात या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. नायक प्रतिष्ठाण व ग्रामपंचायत कार्यालय, श्रीष्टी तांडा यांच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या या सामाजिक उपक्रमाला तांडा व परिसरातील नागरिकांनी प्रतिसाद दिला.

नेत्र तपासणीसह त्वचारोग तज्ज्ञांकडून आरोग्य तपासणी

शिबिरामध्ये नागरिकांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. डोळ्यांच्या विविध तक्रारी असलेल्या नागरिकांना तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. तसेच त्वचारोग तज्ज्ञांकडून त्वचेशी संबंधित आजारांची तपासणी करण्यात आली आणि रुग्णांना आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन देण्यात आले.

ग्रामीण भागातील अनेक नागरिकांना नियमित आरोग्य तपासणीसाठी शहरात जावे लागते. प्रवासाचा खर्च, वेळ आणि आर्थिक अडचणींमुळे काही नागरिक तपासणी पुढे ढकलतात. अशा नागरिकांना गावातच मोफत तपासणीची सुविधा उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा महत्त्वपूर्ण उद्देश होता. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना या शिबिरामुळे आरोग्य तपासणीची संधी मिळाली. निराधार, ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग लाभार्थ्यांसाठी विशेष उपक्रम

आरोग्य तपासणीसोबतच शिबिराच्या ठिकाणी विविध शासकीय पेन्शन योजनांच्या पात्र लाभार्थ्यांची कागदपत्रे स्वीकारून अर्जाच्या फाईल तयार करण्याची प्रक्रिया राबविण्यात आली.

यामध्ये प्रामुख्याने पुढील योजनांचा समावेश होता.

या योजनांसाठी पात्र असलेल्या नागरिकांना आवश्यक कागदपत्रे सादर करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. लाभार्थ्यांच्या अर्जांची फाईल तयार करण्यासाठी कागदपत्रे संकलित करण्यात आली. त्यामुळे शासकीय पेन्शन योजनांचा लाभ मिळविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या निराधार व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग लाभार्थ्यांना मदत झाली. आरोग्यसेवा आणि सामाजिक सुरक्षा योजनांची (पान ३ वर)

# नवरात्रीत कडेगावच्या युवकांचा ऐतिहासिक जागर !

## 'छावा'च्या पथनाट्यातून संभाजी महाराजांच्या शौर्याचा जयघोष!



पारंपरिक वेशभूषा, दमदार अभिनय अन् देवीच्या सोंगाने वेधले ग्रामस्थांचे लक्ष; आगळ्यावेगळ्या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

नवनाथ/गव्हाणे बदनापूर : कडेगाव : नवरात्री उत्सवाचे औचित्य साधून कडेगाव येथील युवकांनी पारंपरिक वेशभूषेत 'छावा' मराठी चित्रपटातील प्रसंगांवर आधारित दमदार पथनाट्य सादर करत उपस्थितांची मने जिंकली. देवीचे सोंग साकारत युवकांनी आपल्या अभिनयातून सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडवले. छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्याची आणि ऐतिहासिक परंपरेची आठवण करून देणारा हा उपक्रम नवरात्री उत्सवाचे विशेष आकर्षण ठरला. भाजपचे गणेश भाऊ कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली त्यांच्या संपूर्ण टीममधील युवकांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. पारंपरिक वेशभूषा, प्रभावी संवादफेक आणि दमदार अभिनयाच्या माध्यमातून युवकांनी ऐतिहासिक प्रसंग जिवंत करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या सादरीकरणातून छत्रपती संभाजी महाराजांच्या पराक्रमाची आणि स्वाभिमानाची प्रेरणा उपस्थितांपर्यंत पोहोचली. या पथनाट्यात गणेश कोल्हे, भानुदास चांगुलपाये, ज्ञानेश्वर नारळे, शुभम शिवनाथ कोल्हे आणि नवनाथ पाचे यांनी विविध भूमिका साकारल्या. युवकांच्या या क (पान ३ वर)

# शिक्षक, पालकांनी मुलांचा ' कल ' लक्षात घ्यावा : प्रा. रंगनाथ खेडेकर ; शास्त्री विद्यालयात पालक मेळावा उत्साहात




परतूर/प्रतिनिधी : पालक व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचा ' कल ' नेमका कुठे आहे हे लक्षात घेऊन पुढील पावले उचलावीत तसेच सकारात्मक व वैज्ञानिक दृष्टिकोन समोर ठेवून वाटचाल करावी असे प्रतिपादन प्रा. रंगनाथ खेडेकर यांनी केले.शहरातील छत्रपती शिवाजीनगरमधील लालबहादूर शास्त्री विद्यालयात शनिवारी (दि. १७) मुख्याध्यापक एल. के. बिरादार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित पालक मेळाव्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते.उपमुख्याध्यापक राजकुमार राऊत हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून पर्यवेक्षक शिवाजी आळणे उपस्थित होते.

खेडेकर पुढे म्हणाले की,शिक्षक, पालक व विद्यार्थी हा प्रगतीचा त्रिवेणी संगम आहे.या तीनही घटकामध्ये समन्वय राहण्यासाठी पालक मेळावे घेतले जातात. अशा प्रकारच्या मेळाव्यामधून विचारांची देवाणघेवाण होते. पालकांना आपल्या मुलांची खरी प्रगती लक्षात येते. झालेल्या चुका सुधारण्याची संधी मिळते.पालकांनी मुलांकडे पुरेसे लक्ष द्यावे. मुलांनी पालकांच्या परिश्रमांची जाणीव ठेवत नियमित अभ्यास करावा. चांगल्या गोष्टी सांगाव्या लागतात. वाईट गोष्टी आपोआप येतात. मोबाईल हा ज्ञानाचा अथांग सागर आहे. परंतु यातून काय घ्यायचे आणि काय नाही हे ठरवणे अतिशय महत्वाचे आहे. असेही खेडेकर शेवटी म्हणाले. यावेळी शिक्षक (पान ३ वर)

**आमच्या विद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध प्रकारचे उपक्रम सातत्याने राबवले जातात.क्रीडा व सांस्कृतिक तसेच स्पर्धा परीक्षेत विद्यालयाचा नावलौकिक आहे.विद्यार्थ्यांच्या तसेच पालकांच्या समस्या लक्षात घेऊन योग्य मार्ग काढला जातो. विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष दिले जाते. याचा परिणाम म्हणजे आज आमच्या विद्यालयाचे अनेक विद्यार्थी शैक्षणिक,सामाजिक, वैद्यकीय,विधी,कला,कृषी,राजकीय या व इतरही अनेक क्षेत्रात चांगले काम करत आहेत.**

**एल. के. बिरादार, मुख्याध्यापक**

# समान काम, समान वेतनासाठी न्यायालयीन कर्मचारी आक्रमक ! बदनापूरसह राज्यभर काळ्या फिती लावून निषेध; १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संपाचा इशारा



बदनापूर / प्रतिनिधी : बदनापूर, दि. १७ ऑक्टोबर : समान काम–समान वेतनाच्या तत्त्वानुसार तसेच उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनवाढ लागू करण्याच्या मागणीसाठी बदनापूर न्यायालयासह राज्यभरातील जिल्हा व अधीनस्थ न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे आंदोलन तीव्र झाले आहे. प्रलंबित मागणीकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी १६ व १७ ऑक्टोबर रोजी कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून कामकाज करत निषेध नोंदविला आहे. मागण्यांची पूर्तता न झाल्यास ५ नोव्हेंबर रोजी सामूहिक रजा आंदोलन, तर १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संपावर जाण्याचा इशारा देण्यात आला आहे.

न्यायदानाच्या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका न्यायव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक असलेल्या अधीनस्थ न्यायालयीन कर्मचाऱ्यांवर दैनंदिन कामकाजाची मोठी जबाबदारी असते. प्रकरणांची नोंदणी, न्यायालयीन अभिलेखांचे व्यवस्थापन, आदेशांची अंमलबजावणी, समन्स व वॉरंट बजावणीसंबंधी प्रक्रिया तसेच पक्षकार आणि वकिलांना प्रशासकीय सहकार्य देण्याची कामे हे कर्मचारी पार पाडतात. न्यायदानाची प्रक्रिया सुरळीतपणे पार पडण्यासाठी

# दुष्काळग्रस्त महिला बचत गटांची कर्जवसुली थांबवा; कर्जमाफी द्या!

**भोकरदन/सुरेश शेळके** : मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या महिला शेतकरी बचत गटांची कर्जवसुली तात्काळ थांबवून त्यांना कर्जमाफी देण्यात यावी, या मागणीसाठी लोकजागर अभियान संघटनेच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा अजित पवार यांना तहसीलदार भोकरदन यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले. शासनाने या मागणीची तातडीने दखल न घेतल्यास २९ ऑक्टोबर २०२६ पासून लाक्षणिक उपोषण सुरु करण्याचा इशाराही संघटनेने दिला आहे. निवेदनात म्हटले आहे की, मराठवाड्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकरी आणि ग्रामीण भागातील नागरिक आर्थिक अडचणीत सापडले आहेत. महिला बचत गटांतील अनेक महिलांनी म्हैसपालन, गायपालन, शेळीपालन, कुक्कुटपालन तसेच इतर लघुउद्योगांसाठी बँका व मायक्रो फायनान्स संस्थांकडून कर्ज घेतले आहे. मात्र, हे उद्योग शेती आणि शेतीपूरक व्यवसायांवर अवलंबून असल्याने दुष्काळाचा मोठा फटका त्यांनाही बसला आहे. खरीप हंगामातील नुकसान आणि आगामी रब्बी हंगामाबाबतची अनिश्चितता यामुळे कर्जाचे हप्ते कसे भरावेत, असा प्रश्न महिला बचत गटांसमोर निर्माण झाला आहे. त्यातच बँका आणि वित्तीय संस्थांकडून कर्जवसुली सुरू असल्याने महिलांवरील आर्थिक ताण वाढत असल्याचे संघटनेने निवेदनात नमूद केले आहे.



सक्तीची कर्जवसुली थांबविण्याची मागणी स्टेट बँक ऑफ इंडिया, एचडीएफसी बँक, सर्व राष्ट्रीयीकृत बँका, अर्बन बँका आणि मायक्रो फायनान्स संस्थांना कर्जवसुलीबाबत तातडीने निर्देश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. दुष्काळग्रस्त महिला बचत गटांना दिलासा देण्यासाठी कर्जमाफी जाहीर करावी आणि शासनाने तातडीने आदेश काढावेत, असेही निवेदनात म्हटले आहे. महिलांना आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी शासनाने त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे आवश्यक आहे. मागण्यांवर त्वरित निर्णय न झाल्यास तहसीलदार कार्यालयासमोर साखळी आंदोलन, उपोषण आणि मोर्चा अशा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा लोकजागर अभियान संघटनेने दिला आहे.

**सक्तीची कर्जवसुली थांबविण्याची मागणी**

**स्टेट बँक ऑफ इंडिया, एचडीएफसी बँक, सर्व राष्ट्रीयीकृत बँका, अर्बन बँका आणि मायक्रो फायनान्स संस्थांना कर्जवसुलीबाबत तातडीने निर्देश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. दुष्काळग्रस्त महिला बचत गटांना दिलासा देण्यासाठी कर्जमाफी जाहीर करावी आणि शासनाने तातडीने आदेश काढावेत, असेही निवेदनात म्हटले आहे. महिलांना आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी शासनाने त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे आवश्यक आहे. मागण्यांवर त्वरित निर्णय न झाल्यास तहसीलदार कार्यालयासमोर साखळी आंदोलन, उपोषण आणि मोर्चा अशा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा लोकजागर अभियान संघटनेने दिला आहे.**

तहसीलदारांनी स्वीकारले निवेदन यावेळी लोकजागर अभियान लढा संघटनेचे केशव पाटील जंजाळ यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. तहसीलदार श्री. काकडे यांनी निवेदन स्वीकारून याबाबतची माहिती शासनाकडे सादर करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

या वेळी सुभाष पोटे, गजानन कड, सचिन तेलंगरे, रेखा जंजाळ, संगीता पगारे, कमलाबाई तेलंगरे, संगीता जाधव, हिराबाई असरे यांच्यासह भायडी, तळणी, विरेगाव, वालसा आणि पेरजापूर येथील महिला बचत गटांच्या सदस्यांची उपस्थिती होती.